जुन्या रोजगार हमी योजनेची शासनमान्य
यादीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
शासन निर्णय क्रमांक : रोहयो-२०१३/प्र.क्र.३२१/रोहयो-८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ मे, २०१६.

**वाचा:-** १) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो - २००८/प्र.क्र.२८/रोहयो-६, दि. ३०.६.२००९.
२) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो - २००८/प्र.क्र.२८/रोहयो-६, दि. २४.७.२०१०.
३) शासन निर्णय क्र. रोहयो - २०१०/प्र.क्र.३३३/रोहयो-८, दि. १८.३.२०११.
४) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. ३१.१०.२०१२.
५) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. १९.९.२०१३.
६) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. ३.७.२०१४.
७) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. ३०.१२.२०१४.
८) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१३/प्र.क्र.४५६/रोहयो-८, दि. २३.१२.२०१३.
९) शासन निर्णय क्रमांक : सुप्रमा - २०१२/प्र.क्र.२५९/रोहयो-८, दि. १२.२.२०१४.
१०) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१३/प्र.क्र.४५६/रोहयो-८,दि. ३.२.२०१५.
११) शासन निर्णय क्रमांक : सुप्रमा - २०१२/प्र.क्र.२५९/रोहयो-८,दि. ४.३.२०१५.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना दि. १.४.२००८ पासून सर्व जिल्हयांत लागू झाली आहे. सदर योजनेस सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) या नावाने संबोधिले जात आहे. दि. १.४.२००८ रोजी जुन्या रोजगार हमी योजनेतील जी कामे अपूर्ण होती ती मग्रारोहयोमध्ये हस्तांतरीत करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या व त्याअनुषंगाने अपुर्ण कामांच्या याद्या पाठविण्याविषयी सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या होत्या, त्याबाबतच्या यादया संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर केल्या होत्या. त्यावर शासन स्तरावर निर्णय घेऊन सदर कामे जुन्या रोजगार हमी योजनेप्रमाणे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार संदर्भाधीन अनुक्रमांक १ ते ३ येथील दि. ३०.६.२००९, दि. २४.७.२०१० व दि. १८.३.२०११ चे आदेश निर्गमित करण्यात आले. सदर आदेशांनुसार रस्त्याची ५७८६ व पाझर तलावाची ४,३४९ अशी एकूण १०,१३५ कामे पूर्ण करण्यास मान्यता दिली होती. सदर कामे ३ वर्षांचा कालबध्द कार्यक्रम आखून पुर्ण करणे आवश्यक होते. ही मुदत दि. ३०.६.२०१२ पर्यंत होती.

दरम्यान दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन अनुक्रमांक ४ येथील दि. ३१.१०.२०१२ च्या शासन निर्णयान्वये सदर कामे पूर्ण करण्यासाठी दि. ३०.६.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या वाढीव मुदतवाढीमध्ये किती कामे पूर्ण झाली व किती कामे अपूर्ण आहेत याबाबतची माहिती सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडून मागविण्यात आली होती. तसेच प्रधान सचिव (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२.८.२०१३ रोजी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (रोहयो), कार्यकारी अभियंता व लेखा अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन आढावा घेण्यात आला. या आढाव्यामध्ये काही कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. सदर कामातील अकुशल भाग पूर्ण झाला

असून कुशल भाग शिल्लक राहिलेला आहे. या कामातील अकुशल भागावर शासनाचा निधी खर्च झालेला आहे. सदर निधी वाया जाऊ नये म्हणून ज्या अपूर्ण कामांना शासनाने मान्यता दिलेली आहे, अशी अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी संदर्भिय अनुक्रमांक ५ येथील दि. १९.९.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दि. ३०.६.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ती संदर्भीय अनुक्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये दि. ३१.७.२०१४ पर्यंत करण्यात आली होती.

दरम्यान सदर कामाबाबत दि. ६.८.२०१३ रोजी सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना एक प्रश्नावली पाठविण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये अपूर्ण कामाबाबत माहिती भरून ती शासनास सादर करण्याचे कळविले होते या प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर प्रकरणी जुन्या रोहयोतून वगळलेली कामे व पूर्ण झालेली कामे सोडून शासनमान्य यादीतील निव्वळ ८७८ कामे शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. या कामापैकी दि. ३१.७.२०१४ रोजी ३६३ कामे पूर्ण झाल्याचे, २३८ कामे वगळल्याचे व २७७ कामे शिल्लक असल्याचे निदर्शनास आले.

अशा कामाबाबत दि. १९.११.२०१४ रोजी सचिव (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त (रोहयो) यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये ही कामे पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्याबाबत चर्चा करण्यात आली व त्यानुसार सदर कामे पूर्ण करण्यास संदर्भाधीन अनुक्रमांक ७ येथील दि. ३०.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये दि. ३०.६.२०१५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली. त्यासाठी संबंधित जिल्हयाने पुढाकार घेऊन कालबध्द कार्यक्रम आखून अपुर्ण कामे विहित मुदतीत पुर्ण करावीत. जेणेकरून या कामावर पूर्वी झालेला खर्च वाया जाणार नाही व ही कामे पूर्णत्वास जातील अशा सूचना ही देण्यात आल्या होत्या.

शासन स्तरावरून अशा अपुर्ण कामांचा आढावा घेत असताना सदर कामे पूर्ण करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयास काही अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. या अडचणीचे निराकरण करण्यासाठी शासनाने संदर्भाधिन अनुक्रमांक ८ येथील दि.२३.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी एक विशेष मोहिम राबविली त्या अंतर्गत काही नियमाना शिथीलता देण्यात आली. सदर विशेष मोहिम दि. ३०.६.२०१४ पर्यत होती. त्यानंतर त्यास संदर्भाधिन अनुक्रमांक १० येथील दि.३.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दि.३०.६.२०१५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली.

अशी कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यकतेनुसार द्यावयाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबत अडचण निर्माण होत होती. त्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे प्राधिकार वित्त विभागाच्या सहमतीने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना संदर्भाधिन अनुक्रमांक ९ येथील दि. १२.०२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले. सदर मुदत दि. ३०.६.२०१४ पर्यत होती. त्यानंतर या अधिकारामध्ये संदर्भाधिन अनुक्रमांक ११ येथील दि. ४.३.२०१५ च्या शासन निर्णयन्वये वाढ करण्यात आली. सदर मुदत दि. ३०.६.२०१५ पर्यत होती.

अशा प्रकारे जुन्या रोजगार हमी योजनेतील दि.१.४.२००८ रोजी अपुर्ण असलेली कामे पुर्ण करण्यासाठी शासन स्तरावरून आढावा घेण्यात आला, ती पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली, सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्राधिकार वित्त विभागाच्या सहमतीने काही विशिष्ट कालावधीसाठी क्षेत्रीय स्तरावर देण्यात आले, जुन्या रोजगार हमी योजनेच्या निकषामध्ये विशिष्ट कालावधीसाठी सुट देण्यात आली. तरीही काही कामे प्रर्दीघ कालावधीनंतर अपुर्ण आहेत. या कामांना प्रर्दीघ कालावधी पूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. ही कामे जुन्या रोजगार हमी योजनेच्या निकषामध्ये बसण्यात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा विवक्षित परिस्थितीत सदर अपुर्ण कामे जुन्या रोजगार हमी योजनेशिवाय इतर योजनेतून पूर्ण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. वरील पार्श्वभूमीवर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

जुन्या रोजगार हमी योजनेतील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती. ती पूर्ण करण्यासाठी नियमात शिथिलता देण्यात आली होती. अशी कार्यवाही केल्यानंतर १४७ कामे शिल्लक आहेत. ती पूर्ण करण्यास मुदतवाढ न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सदर कामे जुन्या रोजगार हमी योजनेशिवाय इतर योजनेतून पूर्ण करावी. ती पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणा यांनी एकत्रितपणे निर्णय घ्यावा. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व यंत्रणेचे अधिकारी यांच्यावर टाकण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बा.कि.रासकर)
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (रोहयो व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
उप सचिव, विधानमंडळ रोहयो समिती (४० प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग
सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग)
निवड नस्ती, रोहयो-८.